Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 11 April 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ११ एप्रिल २०२५ सकाळी ११.०० वाजता.

****

थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महात्मा फुले यांना आदरांजली वाहिली आहे. महात्मा फुले हे मानवतेचे खरे सेवक होते, त्यांनी समाजातल्या शोषित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी आपलं जीवन समर्पित केलं. देशासाठी त्यांचं अमूल्य योगदान प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. वाराणसी इथं तीन हजार ८८० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. या प्रकल्पांमध्ये वाराणसीमध्ये पायाभूत सुविधांचा विकास आणि रस्ते जोडणी प्रकल्पांचा समावेश आहे.

****

केंद्र सरकार अंमली पदार्थ उत्पादकांचं जाळ उध्वस्त करण्यासाठी प्रयत्न करत असून, संबंधित संस्थांवर कठोर कारवाई करत असल्याचं, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. आसाममध्ये २४ कोटी ३२ लाख रुपये किमतीचे ३० किलो अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. या कारवाईसाठी अंमली पदार्थ नियंत्रण मंडळ, आसाम पोलीस आणि केंद्रिय राखीव पोलीस दलाचं शहा यांनी अभिनंदन केलं आहे.

****

साहित्य संस्थांची शिखर संस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध वक्ते आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांची एकमतानं निवड करण्यात आली. सुनिताराजे पवार यांची कार्यवाह म्हणून तर कोषाध्यक्ष म्हणून विनोद कुलकर्णी यांची निवड झाली आहे. पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेत साहित्य महामंडळाची बैठक उषा तांबे यांच्या अध्यक्षतेखाली काल झाली. पुढील तीन वर्षे साहित्य महामंडळाचं कामकाज आणि साहित्य संमेलनांचं आयोजन पुण्यातून होणार आहे.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून तसंच डिजिटल इंडिया अभियानाच्या अनुषंगाने, राज्य शासनाने नागरिक सेवा अधिक प्रभावीपणे डिजिटल स्वरूपात पुरवण्याचा संकल्प केला आहे. शासन आणि नागरिक यांच्यातील दुरावा कमी करून प्रशासन अधिक जवळ आणण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आलं आहे. 'ई-मंत्रिमंडळ' हा उपक्रम कार्यक्षम आणि पारदर्शक प्रशासनाचा पुढचा टप्पा ठरेल, असा विश्वास राज्य शासनाने वर्तवला आहे.

****

ट्राय अर्थात भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने मोबाईल नेटवर्क सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना नेटवर्क कव्हरेजचे तपशील संबंधित कंपनीने ट्रायच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले होते. ट्रायच्या www.trai.gov.in या संकेतस्थळावर consumer info या विभागात मोबाइल कव्हरेज मॅप अंतर्गत हे नकाशे पाहता येतील. कुठल्याही ठिकाणी कोणत्या कंपनीचे किती नेटवर्क उपलब्ध आहे याची माहिती ग्राहकांना या नकाशाद्वारे मिळू शकेल.

****

वेव्हज २०२५ अंतर्गत खादीच्या वापरासाठी नवकल्पना विकसित करण्यासाठी आयोजित केलेल्या मेक द वर्ल्ड वेअर खादी या स्पर्धेच्या अंतिम विजेत्यांची घोषणाही करण्यात आली आहे. त्याचबरोबर इनोव्हेट टू एज्यूकेट : हॅण्डहेल्ड डिवाईस डिझाईन चॅलेंज या स्पर्धेच्या दहा विजेत्यांची घोषणाही इंडियन डिजिटल गेमिंग सोसायटीने केली आहे. हे विजेते येत्या एक ते चार मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या वेव्हजच्या अंतिम फेरीत सहभागी होणार आहेत.

****

गोंदिया इथून सुटणाऱ्या बरौनी एक्स्प्रेसमध्ये चांदीच्या दागिन्यांची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन प्रवाशांना रेल्वे पोलीसांनी ताब्यात घेतलं. त्यांच्याकडून १० किलो ३६८ ग्रॅम चांदीचे दागिने जप्त करण्यात आले. या दागिन्यासंदर्भात चौकशी केली असता कोणतीही वैध कागदपत्रे आढळून आली नसल्यानं ही कारवाई केली.

****

कोल्हापूर जिल्ह्यातल्या श्री क्षेत्र जोतिबा गडावर चैत्र यात्रेसाठी भाविक दाखल होत आहेत. उद्या या यात्रेचा मुख्य दिवस असून, कालपासूनच हजारो भाविक उंचच उंच सासनकाठ्या घेऊन जोतिबाचा गड चढत आहेत. भाविकांसाठी रत्नागिरी डोंगर गायमुख परिसरात १३ एप्रिलपर्यंत मोफत अन्नछत्र चालवण्यात येणार असल्याची माहिती विश्वस्तांनी दिली आहे.

****

चीनमध्ये निंगबो इथं सुरु असलेल्या आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताचं आव्हान संपुष्टात आलं आहे. मिश्र दुहेरीच्या उपान्त्यपूर्व फेरीत आज भारताच्या ध्रूव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांचा हाँगकाँगच्या जोडीकडून पराभव झाला. याआधी पुरुष आणि महिला एकेरी तसंच दुहेरी सामन्यांमध्ये भारतीय खेळाडुंचा पराभव झाला.

****

अमेरिकेत लॉस एंजेलिस इथं २०२८ मध्ये होणाऱ्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या कार्यकारी मंडळानं काल या बाबतची घोषणा केली. ऑलिंपिकमध्ये २० षटकांचे सामने होणार असून, त्यात पुरुष आणि महिला गटांच्या स्पर्धेत प्रत्येकी सहा संघ सहभागी होणार आहेत.

****